**वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या वित्तीय विवरणपत्रातील प्रदेशनिहाय संवितरणाकरिता विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.**

## प्रास्ताविक

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या "महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४" याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली आहे. दिनांक ०५ सप्टेंबर, २०११ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११" (यात यापुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) निर्गमित केला व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करून विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्यायतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करून घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात (पुरवणी अर्थसंकल्पासह) दर्शविण्यात येईल आणि उपरोक्तप्रमाणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे एका मंडळाकडून दुसऱ्या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे न-वळवता येण्याजोगे असतील. आणखी, नियम ८ नुसार राज्य शासन, सर्व क्षेत्रांकरिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व सुधारित खर्च यांचा तसेच, मागील वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशिल दिलेला असेल.

४. एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करून, उक्त आदेशाच्या नियम १० नुसार प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था केली जाईल याची राज्यपाल खातरजमा करतील.

## योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे पुनर्वर्गीकरण

५. आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून, निदेश देतांना दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेले अर्थसंकल्पीय खर्च **"(अ) *अनिवार्य खर्च*" "(ब) *कार्यक्रमांवरील खर्च*"** असे पुनर्वर्गीकरण विचारात घेण्यात आले. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीच्या निदेशांसाठी देखील पुनर्वर्गीकृत अर्थसंकल्पीय खर्च विचारात

घेण्यात आले आहेत. त्यामुळे, निदेशांतर्गत देण्यात येणारी नियतवाटपाची तत्त्वे नवीन वर्गीकरणाच्या तत्त्वावर आधारित आहेत.

## सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती

६. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) प्रदेशनिहाय अनुशेषाचे निर्धारण केले होते **(जोडपत्र-१)**. सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष **₹ ७४१८ कोटी** इतका होता. वर्ष २००० मध्ये प्रचलित आर्थिक मापदंड विचारात घेऊन तो **₹ ६६१८.३७ कोटी** असा सुधारित करण्यात आला आहे. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. १ एप्रिल १९९४ रोजी निव्वळ पेरणी क्षेत्राच्या तुलनेत निर्माण झालेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य (र.स.तु.) एककामध्ये राज्याची सरासरी टक्केवारी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्ह्यांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दरवाढ यांमुळे भौतिक साध्य अनुरुप राहिले नाही.

७. निर्देशांक व अनुशेष समितीने निर्धारित केलेला भौतिक अनुशेष राज्यातील अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या चार जिल्ह्यांमध्ये सध्या अस्तित्वात आहे. २०१०-११ ते २०१४-१५ वर्षांसाठी अनुशेष निर्मूलनाचा पंचवार्षिक कृती कार्यक्रम तयार करुनही, आणि कार्यक्रम कालबद्धरितीने सुधारित करुनही, जलसंपदा विभाग या ४ जिल्ह्यांतील सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करु शकला नाही. अद्याप, प्रस्तावित कार्यक्रमात विर्निदिष्ट केलेल्या उद्दिष्टांच्या तुलनेत साध्य अत्यंत कमी झाले आहे.

जून, २०१९ अखेर उर्वरित भौतिक अनुशेष १,६३,१३९ हेक्टर (र.स.तु.) इतका आहे. **(जोडपत्र-२ अ पहा)**.

८. राज्यपाल यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अनुशेष निर्मूलन कार्यक्रमाप्रमाणे सिंचन क्षमता निर्मितीचे वर्षनिहाय उद्दिष्टे साध्य व्हावीत. या अनुषंगाने राज्यपाल यांनी निदेशित केले होते की, जलसंपदा विभाग, सुधारित वर्षनिहाय उद्दिष्टे आणि त्यासाठीचा कृती कार्यक्रम, सादर करेल. जलसंपदा विभागाने, अनुशेषांतर्गत व अनुशेष कार्यक्रमाबाहेर असलेल्या प्रकल्पांच्या माध्यमातून २,२३,२६४ हेक्टर (र.स.तु.) सिंचन क्षमता निर्मितीचा २०१९ पासून २०२२ पर्यंतचा कार्यक्रम सादर केला होता. मात्र, राज्यपाल यांच्या निदर्शनास आले की, सिंचन क्षेत्राचा दिनांक १,जुलै २०१९ रोजीचा उर्वरित भौतिक अनुशेष १,६३,१३९ हेक्टर (र.स.तु.) आहे. त्यामुळे राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, जलसंपदा विभागाने फक्त उर्वरित भौतिक अनुशेष गृहित धरुनच सुधारित कार्यक्रम तयार करावा. त्याप्रमाणे जलसंपदा विभागाने उद्दिष्टे पुन:श्च सुधारित केली असून जून २०२० ते जून २०२२ या कालावधीचा सुधारित अनुशेष निर्मूलन कार्यक्रम सादर केला आहे. **(जोडपत्र ३)**

९. दिनांक १ मार्च २०१८ च्या निदेशांतील परिच्छेद १० मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, राज्यपाल यांनी, जून १९९४ मध्ये हिंगोली जिल्ह्यात **१५,१६० हेक्टर (प्रमाण रब्बी समतुल्य मध्ये)** इतका भौतिक अनुशेष शिल्लक असल्याबाबत मान्यता दिली आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जलसंपदा विभाग व जलसंधारण विभाग या दोन्ही विभागांनी, केवळ अनुशेष म्हणून निश्चित करण्यात आलेल्या १५,१६० हेक्टर (रब्बी समतुल्य) (र.स.तु.) इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या मर्यादेत प्रकल्प हाती घ्यावेत किंवा त्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. जलसंपदा विभागाने

आता असे सादर केले आहे की, जून २०१९ अखेर हिंगोली जिल्हयाचा शिल्लक भौतिक अनुशेष ८,०४५ हेक्टर (र.स.तु.) (संभाव्य) एवढा आहे. **(जोडपत्र २ ब)**

## आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या सिंचन क्षेत्रासाठीच्या *कार्यक्रमांवरील खर्चाचे* नियतवाटप

१०. जलसंपदा विभागाने, संचिका क्रमांक आखणी -२०२०/प्र.क्र.६७/निवसं-१ द्वारे, असे दर्शविले आहे की, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये जलसंपदा विभागाकरिता *कार्यक्रमांवरील खर्चा*साठी **₹१०२३५.०० कोटी** इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**(क)** यापैकी, **₹ ८१५.०० कोटी** इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास, सामाईक योजना (यांत्रिकीकरण, गुणवत्ता नियंत्रण, ई-गवर्ननन्स इ. ) या प्रकारच्या योजनांसाठी आणि (आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या निदेशांतील परिच्छेद २२ नुसार घ्यावयाच्या प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे, आणि भूसंपादन कायद्यातील कलम १८ व २८ मधील तरतुदी अंतर्गत लोक अदालत अथवा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार भूसंपादन आणि पुनर्वसन यांतील अडचणी मिटविणे यासारख्या योजनांसाठी) निधी राखून ठेवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकारची देयके दिल्यामुळे मंडळनिहाय खर्चामध्ये काही असमतोल निर्माण झाल्यास यापुढील निदेशांमध्ये तो समायोजित करण्यात येईल.

**(ख)** राज्यपाल यांनी राज्य शासनाच्या शिफारशीनुसार, **५ आंतरराज्य प्रकल्प** म्हणजे भंडारा जिल्ह्यातील बावनथडी, यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा, नांदेड जिल्ह्यातील लेंडी, कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिल्लारी, यांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प निदेशांच्या

कक्षेबाहेर ठेवण्यास संमती दिली आहे. आंतरराज्य प्रकल्पांसाठी **₹ ३० कोटी** इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे.

**(ग)** राज्य शासनाने असे कळविले आहे की, गोसीखुर्द प्रकल्पाला यापूर्वी राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला होता. केंद्रीय निधीच्या प्रमाणात राज्य हिस्सा निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यात येत असे. जलसंपदा विभागाने गोसीखुर्द प्रकल्पांकरिता **₹ ५००.००** कोटी प्रस्तावित केले आणि हे निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास विनंती केली आहे. मात्र, राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, केंद्र सरकार ने गोसीखुर्द प्रकल्पाकरिता निधी देणे थांबविले आहे. म्हणून, राज्यपाल यांनी, नियतवाटपाच्या सुत्रानुसार विदर्भ प्रदेशाच्या आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अंतिम विभाज्य नियतवाटपातून इतर दोन प्रदेशांना **₹ ५०० कोटी** फेरवाटप करुन देण्याच्या अटीच्या अधीन राहून, गोसीखुर्द प्रकल्पाकरिता **₹५०० कोटी**चे नियतवाटप आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी, निदेशाच्या कक्षेबाहेर ठेवण्याचे निदेश दिले आहेत.

**(घ)** मराठवाडा प्रदेशातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील दुष्काळप्रवणता आणि तीव्र पाणी टंचाई लक्षात घेऊन, राज्य शासनाने कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पाला विशेष दर्जा देण्यात येत असल्याबाबत कळविले. सदर प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार येत्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पासाठी **₹८५० कोटी** उपलब्ध करुन देण्याचे जलसंपदा विभागाने प्रस्तावित केले आहे. तसेच, सदर **₹ ८५० कोटी** निदेशांच्या बाहेर ठेवण्याबाबत विनंती केली आहे. राज्यपाल यांनी, नियतवाटपाच्या सूत्रानुसार संबंधित प्रदेशांच्या आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अंतिम विभाज्य

नियतवाटपातून, इतर प्रदेशांना **₹ ८५० कोटी** फेरवाटप करुन देण्याच्या अटीच्या अधीन राहून, आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी ही विनंती स्वीकृत केली आहे. जलसंपदा विभागाने याबाबतचा तपशील सादर करावा.

**(च)** शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या २ वर्षांच्या ( जून २०२० ते जून २०२२) कृती कार्यक्रमाप्रमाणे निश्चित केलेल्या कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी लागणारा आवश्यक निधी लक्षात घेऊन, राज्यपाल यांचे असे मत आहे की, अमरावती विभागाच्या भौतिक अनुशेष असलेल्या चार जिल्ह्यांसाठी **₹ १५०० कोटी** इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

**(छ)** उपरोक्त निर्देशित (क), (ख), (ग), (घ), आणि (च) मधील निधी विभाज्य नियत वाटपाच्या कक्षेबाहेर ठेवल्यानंतर उर्वरित **₹ ६५४० कोटी** इतके विभाज्य नियतवाटप सिंचन क्षेत्रासाठीच्या *कार्यक्रमांवरील खर्च*साठी उपलब्ध असेल.

११. एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, सिंचन क्षेत्राकरिता *कार्यक्रमांतर्गत खर्च*साठीचे नियतवाटप खालीलप्रमाणे आरक्षित करण्यात यावे-

**(i)** वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यांतील प्रत्येक घटकाच्या सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी **जोडपत्र ५** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(ii) दिनांक ११ मार्च २०१७ निदेशामधील परिच्छेद १० (iii) नुसार, आर्थिक वर्ष २०१५-१६ पर्यंतच्या खर्चाच्या आधिक्य / तुटीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अंमलात आणण्यात आल्या आहेत. दिनांक ११ मार्च २०१७ च्या निदेशामध्ये दर्शविल्याप्रमाणे या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या तीन वर्षात समान टप्प्यात करण्यात आल्या होत्या. आता, आर्थिक वर्ष २०१६-१७, आर्थिक वर्ष २०१७-१८, आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील खर्चातील आधिक्य / तुटीची भरपाई करणे आवश्यक आहे. जलसंपदा विभागाने असे सादर केले आहे की, आता पावेतो निदेशांमध्ये अशा दुरुस्त्या निधीचे प्रत्यक्ष वितरण न घेता प्रत्यक्ष खर्चाचा आधार घेऊन करण्यात आल्या आहेत. प्रकल्पावरील खर्चावर विविध कारणामुळे परिणाम होत असतो, जसे सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणे, भू-संपादन, वैधानिक मंजूरी मिळणे, शेतकऱ्यांचा विरोध इत्यादी. त्यामुळे प्रकल्पावरील खर्च प्रत्यक्ष वितरणाशी सुसंगत राहात नाही, आणि निधी पाटबंधारे विकास महामंडळाकडे अखर्चित राहतो. यामुळे विकास मंडळ निहाय खर्चामध्ये आधिक्य / तुटी दिसून येते. जलसंपदा विभागाने आर्थिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८, आणि २०१८-१९ वर्षांचे मूळ अर्थसंकल्पित, पुरवणी व पुनर्विनियोजनाद्वारे अर्थसंकल्पित निधी आणि त्याचे प्रत्यक्ष वितरण दर्शविणारी विवरणपत्रे सादर केली आहेत. जलसंपदा विभागाने सादर केले आहे की, राज्यशासन राज्यपाल यांच्या निदेशांचे पालन करीत आहे, आणि निधीचे वाटप झाल्यानंतर तो कधीही समर्पित केला जात नाही. त्यामुळे निधी वितरणावर आधारित दुरुस्त्या विचारात घेण्यात याव्यात. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, पाटबंधारे मंडळांकडील अखर्चित निधी त्याच प्रदेशाच्या खर्चासाठी उपलब्ध असेल असे गृहीत धरून, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ साठीच्या

दुरुस्त्या प्रत्यक्ष वितरणावर आधारित करण्यात याव्यात. या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये समायोजित करण्यात याव्यात. हे समायोजन जोडपत्र ६ आणि जोडपत्र ७ अ मधील स्तंभ ४ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(iii) राज्यपाल यांनी, राज्य शासनाच्या शिफारशीनुसार, विदर्भ प्रदेशातील बेंबळा आणि निम्न वर्धा या प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत प्रकल्पांसाठी वार्षिक योजना २०१९-२० मध्ये, या दोन प्रकल्पांसाठी विदर्भ प्रदेशाच्या वर्ष २०२०-२१ च्या अंतिम विभाज्य नियतवाटपातून इतर दोन प्रदेशांना फेरवाटप करण्याच्या अटीच्या अधीन राहून, **₹५०० कोटी**चे नियतवाटप दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ च्या निदेशाच्या बाहेर ठेवण्यास परवानगी दिली होती. हे समायोजन **जोडपत्र ७ अ** च्या स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(iv) श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांचेकडून निळवंडे सिंचन प्रकल्पांतर्गत कालवा बांधकामासाठी बिनव्याजी कर्ज स्वरुपात मिळणारा रु. ५०० कोटीचा निधी नियतवाटप सूत्राच्या बाहेर ठेवण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडून प्राप्त झाला होता. राज्यपाल यांनी प्रस्तावास अशा अटीच्या अधीन राहून मान्यता दिली होती की, पुढील वर्षांसाठीच्या समन्यायी नियतवाटप तत्वानुसार, प्रकल्पासाठी देण्यात येणारे कर्ज संविभाजीत करून, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळा प्रदेश्याच्या अंतिम विभाज्य नियतवाटपातून मराठवाडा आणि विदर्भ विकास मंडळ प्रदेशांना परतफेड करण्यात यावी. विभागाने असे सादर केले आहे की, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे या प्रस्तावा विरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ट्रस्टने शासनाला

कोणतेही कर्ज अद्याप दिलेले नाही. राज्यपाल यांनी याबाबत जलसंपदा विभागाने नियतकालिक अहवाल सादर करावेत असे निदेश दिले आहेत.

(v) **जोडपत्र ७ अ** मध्ये आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या जलसंपदा क्षेत्रासाठी *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या विभाज्य निधीचे प्रदेशनिहाय नियतवाटप दर्शविण्यात आले आहे.

(vi) हिंगोली जिल्ह्याच्या भौतिक अनुशेष निर्मुलना संदर्भात कार्यक्रमांतर्गत खर्च २०१९-२० मध्ये **₹ २८.५० कोटी** स्वतंत्रपणे जलसंधारण विभागास उपलब्ध करुन दिले होते. तथापि जलसंधारण विभागाने हिंगोली जिल्हयातील कोणत्याही जलसंधारण प्रकल्पांसाठी आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये आतापर्यंत प्रशासकीय मंजूरी दिली नाही. राज्यपाल यांनी या संदर्भात गंभीर चिंता व्यक्त केली आहे. राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हयातील अनुशेष दुर करण्यात जलसंधारण विभागाची मोठी भूमिका आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहे की, जलसंधारण विभाग हा अनुशेष दूर करण्याचा कृती आराखडा सादर करेल. त्यामध्ये विविध टप्पानिहाय प्रकल्पांची यादी, जसे भूसंपादन टप्पा, अंदाजपत्रक टप्पा, कार्यारंभ आदेश टप्पा, पूर्ण झालेले प्रकल्प इत्यादी, आणि त्यांची सिंचन क्षमता, यांसह सादर करावी. या निदेशाचे पालन माहे **मे २०२० पर्यंत** केले जावे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जलसंपदा विभाग हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष दूर करण्यासाठी पुरेसा निधी मराठवाडा प्रदेशाच्या विभाज्य नियतव्ययातून प्रथम राखून ठेवील. राज्यपाल यांनी आणखी असे ही निदेशित केले आहे की, जलसंधारण विभागास **₹ ३०.०० कोटी** इतका निधी हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष दूर करण्यासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात यावा. राज्यपाल यांनी, नियोजन विभागाने याबाबत

समन्वय करावा व प्रगती अहवाल दर सहा महिन्यांनी सादर करावा, असे निदेश दिले आहेत.

(vii) राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, अनुशेषांतर्गत जिल्ह्यांची नक्त प्रत्याक्षी मूल्य (NPV) आणि इतर बाबींची गरज विभाज्य नियतव्ययातून भागविण्यात यावी.

**१२.** त्यामुळे, सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालील **तक्ता १** मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

**तक्ता १.**

**आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी सिंचन क्षेत्राचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय नियतवाटप**

**(₹ कोटी)**

| **प्रदेश** | ***कार्यक्रमांवरील खर्चा*तील उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप (जोडपत्र ७ अ पहावे)** |
|---|---|
| विदर्भ | १२३७.०४ |
| मराठवाडा | १६१३.१५ |
| उर्वरित महाराष्ट्र | ३६८९.८१ |
| **एकूण** | **६५४०.००** |

१३. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले परिच्छेद १०(च ) मधील नियतवाटप हे, कार्यक्रमांवरील खर्चाच्या उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्ह्यांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांतून या जिल्ह्यांकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या एकत्रित

नियतवाटपातून या जिल्ह्यांमधील अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, चालू कामांसाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता होईल, याची खात्री करावी.

१४. आणखी, राज्य शासनाने सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबिल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वरील परिच्छेद ११ (i) मध्ये दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण **जोडपत्र ५** मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, अशा प्रकरणी जलसंपदा विभाग, अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे आणि त्यांचे प्रदेश-निहाय वितरण याबाबतचा तपशील, सादर करेल.

१५. प्रधान सचिव (जलसंपदा) यांनी तीनही विभागातील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेव्हा खर्चाबाबतची सूत्रे नियत वाटपाच्या तत्त्वांशी अनुरूप राखण्यासाठी सुधारात्मक उपाय योजावेत.

१६. राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, प्रकल्पनिहाय निधीचे वाटप करतांना यासाठी स्पष्ट निकष असावेत ज्यामध्ये पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम देण्यात यावा. तसेच, भूसंपादन, पुनर्वसन, नक्त प्रत्याक्षी मूल्य आणि इतर मान्यतांकरिता निधीच्या आवश्यकतेबाबत अग्रक्रम देण्यात यावा. कोणताही निधी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे तसेच, अनुशेष असलेल्या जिल्ह्यातून बिगर अनुशेष जिल्ह्यांकडे वळविता येणार नाही. राज्यपाल यांनी असेही निदेश दिले आहेत की, जर निधींचे पुनर्विनियोजन करावे लागल्यास त्याची सविस्तर कारणे नमूद करावीत.

१७. तीनही प्रदेशांमध्ये चालू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी **जोडपत्र-४** मध्ये दर्शविण्यात आला आहे. चालू प्रकल्पांची शिल्लक असलेली मोठी किंमत तसेच, साधनसंपत्ती "विरळ" होत जाण्याचे धोके लक्षात घेता, राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता, निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेण्यात येऊ नये. हे उत्तरदायित्व लक्षात घेता, हे निदेश सुरूच राहतील.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती

१८. दिनांक ०१ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमध्ये परिगणना केलेला एकंदरीत वित्तीय अनुशेष हा **₹ ६,५८८.७७** कोटी **(जोडपत्र-१)** इतका होता. १९९४ मध्ये परिगणित केलेले वित्तीय अनुशेष दूर झाला आहे. तथापि, काही क्षेत्रांमध्ये (उर्जा, कौशयल्य विकास आणि सार्वजनिक आरोग्य) भौतिक अनुशेष शिल्लक आहे.

१९.

### (क) ऊर्जा क्षेत्र : कृषी पंपसंचांना वीज पुरवठा करणे

(i) कृषी पंपांच्या विद्युतीकरणाचा भौतिक अनुशेष अद्याप रत्नागिरी जिल्हयात शिल्लक आहे. विभागाने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये २५०० कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचे उद्दिष्ट ठेवले होते. तथापि, ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत केवळ २६० कृषी पंपांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. राज्यपाल यांनी या प्रगतीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. राज्यपाल यांनी निदेश दिले आहेत की, उर्जा विभाग या संदर्भातील अडचणी लक्षात घेईल. मागणी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. उद्दिष्ट

साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांमध्ये या योजनेबाबत जनजागृती करण्यासाठी जाहिरात देण्यात यावी.

(ii) उर्जा विभागाने आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील ११५० कृषी पंपांच्या विद्युतीकरणाचे उद्दिष्ट प्रस्तावित केले आहे. यासाठी विभागाने आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये या योजनेकरिता **₹ ३०.००** कोटीची मागणी केली आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये या योजनेसाठी प्रदेशनिहाय नियतव्ययाचे विवरण **जोडपत्र -९** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**(ख) कौशल्य विकास आणि उद्योजकता: औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र माध्यमिक शाळा**

तंत्र माध्यमिक शाळा उपक्षेत्रामध्ये मुंबई शहर (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर जिल्हा (२४० जागा) असा एकूण ५४९ विद्यार्थी जागांचा अनुशेष शिल्लक आहे. विभागाने मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तंत्र माध्यमिक शाळांमध्ये ९ वर्ग सुरु करण्यासाठी ८ नवीन पदे निर्माण करण्याबाबत उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेनंतर वित्त विभागाकडे पुन्हा प्रस्ताव सादर केला होता. राज्यपाल यांनी यासाठी तात्काळ कार्यवाही करण्याचे निदेशित केले होते, जेणेकरून या उपक्षेत्रातील अनुशेष लवकरात लवकर दूर होऊ शकेल. तथापि, विभागाचे म्हणणे आहे की, दोन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा तंत्र माध्यमिक शाळेपेक्षा औद्योगिक प्रशिक्षणाकडे जास्त कल आहे. त्यामुळे विभागाने विनंती केली आहे की, तंत्र माध्यमिक शाळा उप-क्षेत्रातील ५४९ विद्यार्थी जागांचा अनुशेष औद्योगिक प्रशिक्षण उपक्षेत्राकडे गृहीत धरण्यात यावा. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, राज्य शासनाने त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करावा. विभागाने दिनांक ८ जानेवारी, २०२० च्या पत्रान्वये २०२०-२१ च्या ***कार्यक्रमावरील खर्चा*** अंतर्गत अनुशेष

योजनेखाली तंत्र माध्यमिक शाळा, कामठी येथील बांधकामाकरिता **₹४.०८ कोटी** आणि तंत्र माध्यमिक शाळा, खेड येथील बांधकामाकरिता **₹ ०.५० कोटीची** मागणी केली आहे. विभागाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कामठी (जिल्हा नागपूर) येथील बांधकामांसाठी **₹ ४.४० कोटी** आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेल (जिल्हा मुंबई) येथील बांधकामासाठी **₹ ०.१३ कोटीची** मागणी प्रस्तावित केली आहे. राज्यपाल यांचे निदेशांनुसार, आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीचे प्रदेशनिहाय व उपक्षेत्रनिहाय नियतवाटप **जोडपत्र-९** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

## (घ) सार्वजनिक आरोग्य सेवा

दिनांक ०१ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये **₹ १३५३.६७ कोटी** इतका वित्तीय अनुशेष होता. ३१ मार्च, २०१८ पर्यंतचा खर्च विचारात घेता, या क्षेत्रामध्ये **₹ ९४.१९ कोटींचा** वित्तीय अनुशेष शिल्लक होता. सार्वजनिक आरोग्य हे वित्तीय अनुशेष शिल्लक असलेले एकमेव क्षेत्र होते. सार्वजनिक आरोग्य विभागाने आता असे कळविले आहे की, ३१ डिसेंबर २०१९ रोजी या क्षेत्रातील वित्तीय अनुशेष पूर्णतः दूर झाला आहे. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने असे सादर केले आहे की, अनुशेष कार्यक्रमांतर्गत अद्याप ८६ आरोग्य संस्थांची बांधकामे शिल्लक आहेत. यामध्ये २५ ग्रामीण रुग्णालये, ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ५६ उपकेंद्रे यांचा समावेश आहे. राज्यपाल यांनी विभागाने केलेल्या विनंतीनुसार, वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रूग्णवाहिका, उपकरणे, इतर साधनसामुग्री आणि फर्निचर याकरिता **₹१३१.६८ कोटी** इतके नियतवाटप करण्याबाबत निदेश दिले आहेत. सदर नियतवाटपाचे प्रदेशनिहाय विवरण **जोडपत्र-९** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

२०. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता *कार्यक्रमांवरील खर्च*मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी **₹ १७०.७९ कोटी** इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे. सन २०२०-२१ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालील **तक्ता २** प्रमाणे करण्यात यावे. प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्रनिहाय नियतवाटप **जोडपत्र ९** मध्ये दर्शविलेले आहे.

**तक्ता २.**

**आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप**

| अ.क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (₹ कोटी) (जोडपत्र ९) |
|---|---|---|
| १. | विदर्भ | १७.७४ |
| २. | मराठवाडा | २०.२५ |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | १३२.८० |
| **एकूण** | | **१७०.७९** |

## *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या उर्वरित निधीच्या वाटपाची तत्वे

२१. *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग (सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियतवाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर), तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या

एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. *कार्यक्रमावरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियतवाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधीन राहील.

२२. राज्यपाल यांनी असे निदेशीत केले होते की, वित्त विभागाने विभाग-निहाय आणि विकास मंडळ-निहाय अनिवार्य खर्चातील विकासात्मक खर्चाच्या भागाचा तपशिलही प्रकाशित करावा.

## विकास मंडळे

२३. प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्ह्यांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा, हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशांनुसार चालू राहतील. जिल्ह्यांची निवड करताना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांना प्राधान्य द्यावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्देशानुसार मंडळे इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी प्रत्येक विकास मंडळासाठी **₹ २.०० कोटी** राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. त्यानुसार मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा.

## अनुच्छेद ३७१ (२) (ग) नुसार राज्यपालांची विशेष जबाबदारी

२४. संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (ग) आणि विकास मंडळे आदेश २०११ च्या नियम १० नुसार, राज्यपाल यांना प्रत्येक विकास मंडळ क्षेत्रांतर्गत तंत्रशिक्षण व व्यवसाय

प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सुविधा आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायी व्यवस्था करण्याची विशेष जबाबदारी आहे.

२५. राज्यपाल यांनी सामान्य प्रशासन विभागाला राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये क्षेत्रनिहाय प्रतिनिधित्वाबाबतची आकडेवारी सादर करण्याबाबत निदेशित केले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था आणि सरकार पुरस्कृत महामंडळे याबाबतची माहितीही यासाठी विचारात घ्यायची होती. या निदेश्यांच्या अनुपालनास्तव, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे वित्त मंत्री यांचे अध्यक्षतेखाली याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली होती. दिनांक १४ नोव्हेंबर २०१९ च्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे की, मंत्रिमंडळ उप समितीच्या २७ मे २०१९ च्या बैठकीमध्ये, उप समितीने या संदर्भात खालील प्रमाणे शिफारशी केल्या आहेत:

> “कोकण व नागपूर विभागातील उमेदवार शासकीय सेवेत कमी असल्याने उच्च व तंत्र शिक्षण विभाग अशा उमेदवारांकरिता मार्गदर्शन केंद्रे स्थापन करुन स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करण्यासाठी कोचिंग योजना तयार करेल.”

राज्यपाल यांनी मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशींची नोंद घेतली आहे.

## निदेशांचे अनुपालन

२६. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम २१ (१) व (२) मधील तरतुदीनुसार, राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष निर्मूलनाची विशेष

जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर आहे. राज्यपाल यांनी अमरावती विभागातील चार जिल्हे आणि मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्हा येथील सिंचन अनुशेष निर्मूलनाबाबत राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीच्या संनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अनुशेष असलेल्या जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्राशी संबंधित सुधारित प्रशासकीय मान्यता, पुनर्विनियोजनाचे अधिकार, पुरेशा कर्मचारी वर्गाची उपलब्धता, भूसंपादन आणि पुनर्वसन याबाबत निदेशांच्या अनुपालनाचा नियतकालिक आढावा घ्यावा. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निदेशांच्या अंमलबजावणीबाबत पूर्तता अहवाल, काही शिफारशी असल्यास, त्यांसह राज्यपालांना तिमाही सादर करावा.

२७. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) आणि आदेशातील नियम ७ नुसार योजनेतर विकास खर्चाचे प्रदेशनिहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या विशेष जबाबदारीच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेतर खर्चाची आकडेवारीसुद्धा प्रसिद्ध करण्याविषयी दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशांमध्ये निदेश दिले होते. हे निदेश १३ मार्च, २०१३, १५ फेब्रुवारी २०१४ आणि १० मार्च, २०१५ च्या निदेशांमध्ये पुन:श्च देण्यात आले होते. वित्त विभागाने आर्थिक वर्ष २०११-१२ आणि २०१२-१३ साठीची प्रदेशनिहाय खर्च (योजनेतर) ची माहिती सादर केली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षांची प्रदेशनिहाय योजनेतर विकास खर्चाची माहिती सादर झालेली नाही. गत वर्षीचे प्रदेशनिहाय ***कार्यक्रमांवरील खर्च*** तसेच, ***अनिवार्य खर्चा***चे संकलन जुलै, २०२० पर्यंत करण्यात यावे असे निदेश आहेत.

२८. राज्यपाल यांनी निदेश दिले आहेत की, प्रदेशनिहाय कार्यक्रमांवरील खर्चाची आकडेवारी दरवर्षी लवकरात लवकर प्रकाशित करावी. राज्यपाल यांनी असेही निदेशित केले आहे की, ही आकडेवारी “ऑन लाईन” ठेवण्यात यावी.

२९. दिनांक १३ मार्च, २०१३ च्या निदेशातील परिच्छेद ३७ नुसार, नियोजन विभागाने अर्थसंकल्प पत्रकांतील अविभाज्य खर्चाची बाबनिहाय पुनर्तपासणी करावी आणि शक्य असेल तेथे त्या त्या प्रदेशांसाठी खर्च दर्शवावा असे राज्यपाल यांनी निदेशित केले होते. दिनांक १० मार्च, २०१५ च्या परिच्छेद ३९ मध्ये राज्यपाल यांनी पुन:श्च असे निदेशित केले आहे की, बाबनिहाय खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत ज्यायोगे कोणतीही विभाज्य बाब चुकीने अविभाज्य बाब म्हणून गणली जाणार नाही याची खात्री होईल. दिनांक ११ मार्च, २०१६ च्या परिच्छेद ४४ मध्येही अशाच प्रकारचे निदेश देण्यात आले होते. सदर वर्गीकरणाचा तपशिल जुलै, २०१६ पर्यंत राज्यपालांना सादर करावा असे राज्यपाल यांचे निदेश होते. नियोजन विभागाने असे कळविले आहे की, वार्षिक योजना अंतिम करत असतांना नियोजन विभागामार्फत अविभाज्य बाबी नियोजन विभागाच्या योजना माहिती प्रणाली द्वारे तपासण्यात येतात. नियोजन विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना असेही सूचित केले आहे की, अविभाज्य बाबी शक्य तितक्या कमी ठेवून अविभाज्य ठेवण्यात आलेल्या बाबींचे वितरण झाल्यानंतर, हा खर्च मंडळ-निहाय दर्शविण्यात यावा. वार्षिक विवरणपत्रातील वर्गीकरणामधील बदल विचारात घेता वित्त विभागाला असे निदेश देण्यात येत आहेत की, *कार्यक्रमांवरील खर्चा*तील अविभाज्य घटक शक्यतो कमीत कमी ठेवण्यात यावा आणि योग्य पद्धतीने वर्गीकृत करावा.

३०. राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील अनुशेष निर्मूलनासंदर्भातील सर्व बाबींचा त्रैमासिक आढावा घ्यावा व अनुशेष निर्मूलनांतर्गत कामातील प्रगतीबाबत लक्ष ठेवावे.

३१. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनाचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

३२. निर्देशांक व अनुशेष समितीने १९९४ मध्ये परिगणित केलेला चालू वित्तीय अनुशेष दुर करण्यात आल्यानंतर, आणि २५ हून अधिक वर्षे झाल्यामुळे आता १ एप्रिल १९९४ नंतर तयार झालेल्या प्रादेशिक विकासातील असमतोलाचे मुल्यांकन करण्याची गरज आहे. २०११ साली डॉ.विजय केळेकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने संतुलित प्रादेशिक विकासासाठी समिती स्थापन केली होती, परंतु त्या शिफारशींवर फारसे काही करण्यात आलेले नाही. सद्यस्थितीतील आकडेवारीनुसार प्रदेशांतर्गत विकास क्षेत्रांमध्ये व्यापक असमानता दिसून येते. या अनुषंगाने, राज्यपाल यांनी राज्य सरकारला असे निदेश दिले आहेत की, विविध प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सूचविणे, यासाठी समिती स्थापन करावी. या समितीने वर्षाच्या आत आपला अहवाल सादर करावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**(संतोष कुमार)**
**राज्यपालांचे प्रधान सचिव**

**राजभवन, मुंबई.**

**दिनांक: २८ फेब्रुवारी, २०२०**

## जोडपत्र १

### निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार दिनांक ०१ एप्रिल, १९९४ रोजीचा प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| अ.क्र. | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १. | विदर्भ | ४०८३.००<br>(५५.०४%) | २५४१.०२<br>(३८.५७%) | ६६२४.०२<br>(४७.६०%) |
| २. | मराठवाडा | २४०१.००<br>(३२.३७%) | १६०३.५५<br>(२४.३४%) | ४००४.५५<br>(२८.७७%) |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.००<br>(१२.५९%) | २४४४.२०<br>(३७.०९%) | ३३७८.२०<br>(२३.६३%) |
| **एकूण** | | **७४१८.००**<br>**(१००%)** | **६५८८.७७**<br>**(१००%)** | **१४००६.७७**<br>**(१००%)** |

आधार: निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल

जोडपत्र २ अ

अमरावती विभागातील भौतिक अनुशेष (सिंचन क्षेत्र) ची स्थिती

जून २००७ चा अनुशेष = ३,३८,०७० हेक्टर (र.स.तु.)

| | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) | उर्वरित अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) |
|---|---|---|
| जून २००८ | ४६,७०० | २,९१,३७० |
| जून २००९ | २७,९१७ | २,६३,४५३ |
| जून २०१० | ५,९३५ | २,५७,५१८ |
| जून २०११ | ९,५७० | २,४७,९४८ |
| जून २०१२ | १३,९२९ | २,३४,०१९ |
| जून २०१३ | ६,७५० | २,२७,२६९ |
| जून २०१४ | ३,५६४ | २,२३,७०५ |
| जून २०१५ | ९,४३६ | २,१४,२६९ |
| जून २०१६ | १९,८३७ | १,९४,४३२ |
| जून २०१७ | ६,६९९ | १,८७,७३३ |
| जून २०१८ | ८,२५६ | १,७९,४७७ |
| जून २०१९ | १६,३३८ | १,६३,१३९ |

आधार: जलसंपदा अहवाल

# जोडपत्र २ ब

## हिंगोली जिल्ह्यातील भौतिक अनुशेष (सिंचन क्षेत्र) ची स्थिती

जून, १९९४ चा अनुशेष = १५,१६० हेक्टर (र.स.तु.)

जून, २०१६ चा अनुशेष = ११,९०० हेक्टर (र.स.तु.)

| | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) | उर्वरित अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) |
|---|---|---|
| जून २०१७ | २,००० | ९,९०० |
| जून २०१८ | १,२१० | ८,६९० |
| जून २०१९ | ६४५@ | ८,०४५@ |

@ संभाव्य

आधार: उप सचिव (जलसंपदा) यांचे पत्र क्र. नियोजन -२०२०/प्र.क्र.२/निवसं-१, दिनांक ३ फेब्रुवारी २०२० अन्वये सादर केल्याप्रमाणे

# जोडपत्र ३

## सुधारित भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रम (सिंचन क्षेत्र)*

(हेक्टर र.स.तु.)

| जिल्हा | १ जुलै, २०१९ रोजीचा शिल्लक भौतिक अनुशेष | अनुशेषांतर्गत व अनुशेष कार्यक्रमाबाहेरील प्रकल्पांद्वारे सिंचन क्षमता निर्माण करण्याबाबतचे नियोजन | | | | | अनुशेष निर्मूलनाचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | या वर्षी २०१९ मधील उर्वरित पूर्ण करण्याचे नियोजन | जून - २०२० | जून - २०२१ | जून - २०२२ | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. अमरावती | ६७,७०७ | ५,२६८ | १४,६२३ | २२,४९९ | २५,३१९ | ६७,७०९ | जून -२०२२ |
| २. अकोला | ४३,९४० | ६,३६६ | ११,५४२ | १७,७५० | ८,३१६ | ४३,९७४ | जून -२०२२ |
| ३. वाशिम | ५,६०८ | ९६३ | ३,७२४ | ५,२२४ | ० | ९,९११ | जून -२०२१ |
| ४. बुलढाणा | ४५,८८४ | १,०९९ | ६०० | १६,४३७ | २७,७८१ | ४५,९१७ | जून -२०२२ |
| **एकूण विभाग** | **१,६३,१३९** | **१३,६९६** | **३०,४८९** | **६१,९१०** | **६१,४१६** | **१,६७,५११** | |

*** आधार: उप सचिव (जलसंपदा) यांनी राज भवन येथील दि. १३ फेब्रुवारी २०२० च्या बैठकीच्या सादर केलेल्या पूर्तता अहवाला प्रमाणे**

## जोडपत्र ४

### राज्यातील चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत

| अ. क्र. | प्रदेश | दिनांक ०१ एप्रिल, २०१९ रोजीची प्रकल्प संख्या | दिनांक ०१ एप्रिल, २०१९ रोजीची शिल्लक किंमत (₹ कोटीत) @ |
|---|---|---|---|
| १. | विदर्भ | १२३ | ४३,५६०.५७ |
| २. | मराठवाडा | ५५ | १६,३८५.०७ |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | १३५ | ४९,४४४.५३ |
| | एकूण | ३१३ | १,०९,३९०.१७ |

@ तात्पुरती किंमत.

आधार: उप सचिव (जलसंपदा) यांनी राज भवन येथील दि. १३ फेब्रुवारी २०२० च्या बैठकीच्या सादर केलेल्या पूर्तता अहवाला प्रमाणे

## जोडपत्र ५

*कार्यक्रमावरील खर्च* २०२०-२१ मधील सिंचन क्षेत्रातील विभाज्य नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्त्वे दर्शविणारे विवरणपत्र

| विभाग | लोकसंख्या* (२०११ जनगणना) | लोकसंख्येची टक्केवारी | निव्वळ पेरलेले क्षेत्र # (हजार हेक्टर) | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २३००३१७९ | २३.०३ % | ५१०६.८ | २८.२७ % | २५.६५ % |
| मराठवाडा | १८७२७७४८ | १८.७५ % | ४७५५.९ | २६.३३ % | २२.५४ % |
| उर्वरित महाराष्ट्र | ५८१६३५९८ | ५८.२३ % | ८१९९.३ | ४५.४० % | ५१.८१ % |
| **एकूण** | **९९८९४५२५** | **१०० %** | **१८०६२.०** | **१०० %** | **१०० %** |

* आधार- जणगणना २०११      # आधार-निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल, खंड एक

# जोडपत्र ६

## आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ मध्ये प्रदेशनिहाय करण्यात येणाऱ्या विभाज्य नियतव्ययाची विभागणी आणि प्रत्यक्ष वितरण यामधील तफावती बाबतचे संकलित स्वरुपातील विवरणपत्र

(₹ कोटीत)

| प्रदेश | आर्थिक वर्षासाठी करावयाच्या दुरुस्त्या | | | | आर्थिक वर्षात करावयाच्या दुरुस्त्या |
|---|---|---|---|---|---|
| | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | एकूण | २०२०-२१ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| विदर्भ | १२५.९४३३ | -१०३.३४७९ | -९१.३२१२ | -६८.७२५८ | -६८.७२५८ |
| मराठवाडा | ९.६५४३ | ४०.२३१५ | -२३.५५३९ | २६.३३१९ | २६.३३१९ |
| उर्वरित महाराष्ट्र | -१३५.५९७६ | ६३.११६४ | ११४.८७५० | ४२.३९३९ | ४२.३९३९ |

१. उणे (-) चिन्ह प्रदेशातून निधी काढून घेण्याबाबत दर्शविते.

२. अधिक (+) चिन्ह प्रदेशाला निधी उपलब्ध करण्याबाबत दर्शविते.

# जोडपत्र ७ अ

निधीचे नियत वाटपाच्या तत्त्वाधारे करावयाचे संवितरण, विभाज्य नियतव्ययाची विभागणी आणि प्रत्यक्ष वितरण यामधील तफावती आणि प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेचा वर्ष २०१९-२० मध्ये देण्यात आलेला अतिरिक्त निधी यांतील दुरूस्ती, इत्यादींनुसार तीन प्रदेशांसाठी निधीचे नियतवाटप दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| प्रदेश | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण (सम प्रमाणात) | शिल्लक निधींचे संवितरण | २०२०-२१ मध्ये करावयाची आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ मधील विभाज्य नियतव्ययाची विभागणी आणि प्रत्यक्ष वितरण यामधील तफावतीची दुरूस्ती ** | प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेचा वर्ष २०१९-२० मध्ये देण्यात आलेला ₹५०० कोटी अतिरिक्त निधी मधील सुधारणा@ | एकूण विभाज्य नियतव्ययाचे वाटप (स्तंभ ६ = स्तंभ ३ + स्तंभ ४ + स्तंभ ५ ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **विदर्भ** | २५.६५ % | १६७७.५१ | -६८.७२ | -३७१.७५ | **१२३७.०४** |
| **मराठवाडा** | २२.५४ % | १४७४.१२ | २६.३३ | ११२.७० | **१६१३.१५** |
| **उर्वरित महाराष्ट्र** | ५१.८१ % | ३३८८.३७ | ४२.३९ | २५९.०५ | **३६८९.८१** |
| **एकूण** | १०० % | ६५४०.०० | | | ६५४०.०० |

** जोडपत्र ६ स्तंभ ६ पहा. @ परिच्छेद ११(iii)

तळटीप:
१. उणे (-) चिन्ह प्रदेशातून निधी काढून घेण्याबाबत दर्शविते.
२. अधिक (+) चिन्ह प्रदेशाला निधी उपलब्ध करण्याबाबत दर्शविते

## जोडपत्र ७ ब

जलसंपदा निधीचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

<table>
<tr><td colspan="2">परिच्छेद १० (क) मधील घटकांकरिता नियतवाटप</td><td>८१५.००</td></tr>
<tr><td rowspan="2">विशेष प्रकल्पांसाठीचे नियतवाटप</td><td>आंतरराज्य प्रकल्प</td><td>३०.००</td></tr>
<tr><td>अमरावती विभागांतर्गत ४ जिल्ह्यांसाठी अनुशेष निर्मुलन</td><td>१५००.००</td></tr>
<tr><td colspan="2">गोसीखुर्द प्रकल्पाकरिता नियतवाटप<br>(परतफेड करण्याच्या अटीवर)</td><td>५००.००</td></tr>
<tr><td colspan="2">कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पाकरिता नियतवाटप<br>(परतफेड करण्याच्या अटीवर)</td><td>८५०.००</td></tr>
<tr><td colspan="2">प्रदेशनिहाय नियतवाटप (विभाज्य नियतवाटप) (सामान्य)</td><td>६,५४०.००</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>१०,२३५.००</td></tr>
</table>

## जोडपत्र ८

दिनांक ३१.१२.२०१९ रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| ३१.०३.२००० ची स्थिती | ३१.०३.२०१५ ची स्थिती | ३१.०३.२०१६ ची स्थिती | ३१.०३.२०१७ ची स्थिती | ३१.०३.२०१८ ची स्थिती | ३१.०३.२०१९ ची स्थिती | ३१.१२.२०१९ ची स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १३५३.६७ | २३९.१० | १७४.२३ | १३४.८० | ९४.१९ | ३१.१७ | निरंक |

# जोडपत्र ९

*कार्यक्रमावरील खर्च* २०२०-२१ मधील (सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील) अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र निहाय नियतवाटप दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| अ. क्र. | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग | | | | |
| १. अ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ४.४० | ० | ०.१३ | ४.५३ |
| १. ब | तंत्र माध्यमिक शाळा | ४.०८ | ० | ०.५० | ४.५८ |
| १. | एकूण कौशल्य विकास आणि उद्योजकता | ८.४८ | ० | ०.६३ | ९.११ |
| २. | सार्वजनिक आरोग्य | ९.२६ | २०.२५ | १०२.१७ | १३१.६८ |
| ३ | पंपसंचांचे विद्युतीकरण | ० | ० | ३०.०० | ३०.०० |
| | एकूण (१+२+३) | १७.७४ | २०.२५ | १३२.८० | १७०.७९ |

**तळटीप:** उपरोक्त नियतवाटपा खेरीज, **₹ ६ कोटी** इतकी रक्कम परिच्छेद २३ मध्ये विशद केलेल्या प्रयोजनांकरिता राखून ठेवण्यात येईल.